( महाराष्ट्र शासन – आरोग्य सेवा )

# तालुका आरोग्य अधिकारी, येवला

आरोग्य विभाग, पहिला मजला पंचायत समिती कार्यालय येवला

फोन नंबर : ०२५५९ – २६५०४६
ईमेल : thoyeola@gmail.com

डॉ. शरद श्रीरंग कातकाडे
तालुका आरोग्य अधिकारी

जा.क्र.पंसये/आरोग्य/आस्था-१/३०६/ २०२५ दिनांक – १६/०९/२०२५

प्रति,
मा.सहसंचालक साहेब,
आरोग्य सेवा (खरेदी कक्ष) मुंबई

विषय :- निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपरकणे व जडवस्तू संग्रह यांचे विक्रीकरीता दरपत्रक सुचना वेबसाईटवर प्रकाशित करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आरोग्य विभागांतर्गत तालुका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांतील निर्लेखित केलेली उपकरणे व जडवस्तू यांची अंतिम विल्हेवाट लावणेकरिता विक्री करावयाची आहे. याकरिता ईच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांकडून सिलबंद लिफाप्यात दरपत्रके मागविण्याकरिता दरपत्रक सुचना वेबसाईटवर प्रकाशित करण्याबाबत आपणास विनंती करण्यात येत आहे. करीता आपले स्तरावरुन उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर

डॉ. शरद श्रीरंग कातकाडे
तालुका आरोग्य अधिकारी(गट-अ)
आरोग्य विभाग, येवला

Scanned with OKEN Scanner

-: दरपत्रक सुचना :-

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील निर्लेखित केलेली रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह यांची विक्री करिता ईच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांकडून सिलबंद लिफाप्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रक मागविण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे..

दरपत्रक कार्यवाही वेळापत्रक

| SR.NO. | Activity | Date/Period |
|---|---|---|
| 1 | Sale Of Quotation(Free Of Cost) | 16/09/2025 to 26/09/2025 |
| 2 | Date Of Submitting Quotation | 29/09/2025 to 09 /10/2025 |
| 3 | Last Date Of Submitting Quotation | 16/10/2025 |
| 4 | Quotation Opening | 17/10/2025 |

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक येथिल विक्री करावयाच्या निर्लेखित केलेली रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह यांचा तपशिल ईच्छूक नोंदणीकृत प्रतिष्ठांणांनी आपले प्रतिष्ठाणाचे दरपत्रके पात्रतेसाठी खालिलप्रमाणे प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

१) Shop Act रजिस्ट्रेशन ची प्रत(गुमास्ता नोंदणी पत्र)

२) Pan Card ची प्रत (पॅन कार्ड)

३) GST Registration Certificate (जि.एस.टी नोंदणी पत्र )

४) Quotation On Firms Letterhead (प्रतिष्ठाणाचे लेटर हेडवर दरपत्रक)

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांना दरपत्रकातील कोणत्याही बाबीची संख्या कमी जास्त करण्याचे आणी कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारण्याचे/वेळापत्रकात बदल करण्याचे/संपूर्ण प्रक्रीया रदद करण्याचे सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

डॉ .शरद श्रीरंग कातकाडे
तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
आरोग्य विभाग, येवला

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| Name of Program | Sale of Condemned Items |
| Name & Designation of Officer | Tulaka Health Officer,Yeola |
| Date of Publication | 16/09/2025 |
| Displayed on Website<br>(Please check box) | www.arogya.maharashtra.gov.in<br>www.nhm.maharashtra.gov.in |
| Published on Section/ Tab of Website | |
| Document Title Should be Displayed as (In Marathi) | निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह यांची विक्री करणेबाबत सुचना... |
| Document Title Should be Displayed as (In English) | Notice for Sale of Condemned Cold Chain Equipments |
| Document Size<br>(Document should be in PDF Format and size will not more than 20 MB) | |

## Declaration

I hereby declare that all information provided in this website document upload form (WDU) for the purpose of uploading/updating document on website only and correct to the best of my knowledge. All documents responsibility will be on concern program department only;IT NHM deprtment is not responsible for any breach cause to content of uploaded documents. IT NMH department only for uploading/updating documents on websites.

Date :- 16/09/2025

Signature Of Programme

Authority :- Taluka Health Office,Yeola

Scanned with OKEN Scanner

आरोग्य विभाग

तालूका आरोग्य अधिकारी तालूका येवला जिल्हा नाशिक

आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील निर्लेखित केलेली रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळीं उपकरणे व जडवस्तू संग्रह लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे. इच्छुक ठेकेदारांनी विक्री फॉर्म नमुना प्राप्त करणेसाठी या कार्यालयाशी दि. १६/०९/२०२५ ते २६/०९/२०२५ या कालावधी मध्ये सकाळी ११ ते ३ या वेळेत संपर्क साधावा.

विक्री फॉर्म कोटेशनसह जमा करण्याचा अंतिम दि. १६/१०/२०२५

दुरध्वनी क्र. :-

ई-मेल :- thoyeola@gmail.com

डॉ. शरद श्रीरंग कातकाडे

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)

आरोग्य विभाग, येवला

Scanned with OKEN Scanner

## -: अटी व शर्ती :-

१) दरपत्रक तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांचे कार्यालयात दिनांक २९/०९/२०२५ ते ०९/१०/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेच्या आत सादर करावेत.

२) सदरील दरपत्रक मोहरबंद लिफाफयामध्ये सादर करण्यात यावेत. सदरील लिफाफयावर निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह खरेदीकरीता दरपत्रके असे ठळकपणे नमूद करण्यात यावे.

३) विहीत मुदतीत प्राप्त झालेलीच दरपत्रके स्विकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) सदरील नमूद दरामध्ये खाडाखोड अथवा अंक गिरवले असता सदर दरपत्रक बाद करण्यात येईल.

५) सदरील दरपत्रक तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांचे कार्यालयात दिनांक १७/१०/२०२५ रोजी उघडण्यात येईल.

६) खरेदीधारकास शासकीय कामाचा अनूभव असल्यास प्राध्यान्य देण्यात येईल.

७) सदर, सर्व लॉटची खरीदाराकडून लावण्यात येणा-या किंमतीची एकूण येणारी रक्कम ज्या खरीदाराची जास्त असेल त्याप्रमाणे अनुक्रम लावले जातील.

८) सदर निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू संग्रह ७ दिवसाच्या आत उचल करणे बंधनकारक राहील व उचल करण्याची जबाबदारी खरेदीधारकाची राहील. याकरिता कुठलाही वाहतूक भत्ता, कूरीयर, किंवा इतर भाडे या कार्यालयामार्फत अदा करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

९) दरपत्रकरंना प्रतिसाद न मिळाल्यास अथवा त्यामध्ये त्रुटी आढळल्यास ही दरपत्रके स्विकारणे, नाकारणे, अथवा रदद करणे, इत्यादी अधिकार तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांना राहतील.

डॉ .शरद श्रीरंग कातकाडे
तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
आरोग्य विभाग, येवला

Scanned with OKEN Scanner

## विक्री फॉर्म नमूना

विषय :- आरोग्य विभागांतर्गत तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या विभागांतील अंतिम निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू यांचे विक्री करणे बाबत...

संदर्भ :- या कार्यालयाची रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू यांची विक्री दरपत्रक सुचना arogya.maharashtra.gov.in व www.nhm.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रकाशित दि. १६/०९/२०२५

कार्यालयातील निर्लेखित रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू यांची विक्री पुढील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

१) **विक्री करावयाची रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू आपणास तालुकास्तरावरील प्राथमिक आरोग्य केंद्रात दि २९/०९/२०२५ ते ०९/१०/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते ३.०० या कार्यालयीन वेळेत पाहता येईल**

२) विक्री करावयाच्या रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तूंची यादी आपणास तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक येथे **दि २९/०९/२०२५ ते ०९/१०/२०२५** पर्यंत सकाळी ११.०० ते ३.०० या कार्यालयीन वेळेत पाहता येईल

३) वस्तू जशा स्थितीत आहेत त्या स्थितीत विकणे आहे.

४) ठेकेदारास तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक येथून निवीदा फॉर्म प्राप्त करावा लागेल आणि त्या अधिकृत फॉर्मवरच निर्लेखित वस्तू विक्री बाबतचा लखोटा असे नंमुद करुन सिलबंद लखोटा जाहीरातील नमुद अंतिम तारखे पुर्वी दि. १६/१०/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावा लागेल.

५) वेळे नंतर अथवा उशिरा आलेले लखोटे स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६) सदरील लॉट नं. १ व २ हे एकाच ठेकेदारास घेणे बंधनकारक असेल.

७) अधिकृत फॉर्म सादर न केल्यास आपले दरपत्रक रदद करण्यात येईल.

८) संपुर्ण लॉटची किंमत आपणास नमूद करावी लागेल. सदर किंमतीवर आपणास १८ टक्के दराने जी.एस.टी. भरावा लागेल.

९) फॉर्म सोबत पॅन कार्ड,जि.एस.टी नोंदणी पत्र, बॅंक डिटेल, शॉप ॲक्ट इत्यादी कागदपत्रे असणे अनिवार्य आहे. सदर कागदपत्रे आपल्या अर्जासोबत जोडली नसतील तर आपला अर्ज रदद करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१०) आपले दरपत्रक मान्य झाल्यास आणि कार्यालयाचे आदेश आपणास प्राप्त झालेस त्याच दिवशी एकूण १०० टक्के एवढी रक्कम आपणास जमा करावी लागेल आणि जी.एस.टी. १८ टक्के असे एकूण रक्कम धनाकर्षाच्या(डिमांड ड्राफट) च्या स्वरुपात या कार्यालयामध्ये पुढील ५ दिवसामध्ये जमा करावी लागेल. अन्यथा आपला कोणताही अधिकार या लॉटवर राहणार नाही.

११) रुग्णालयीन उपकरणे, शीतसाखळी उपकरणे व जडवस्तू आपणास आहे त्या जागेवरुन कार्यालयास बाब विचारात घेवून स्वखर्चाने घेऊन जावी लागतील.

Scanned with OKEN Scanner

१२) सदरची निवीदा / फॉर्म स्विकारणे,नाकारणे अथवा रदद करणे या बाबतचे सर्व अधिकार कार्यालय प्रमुख या नात्याने तालूका आरोग्य अधिकारी, तालूका येवला जिल्हा नाशिक यांनी राखून ठेवलेले आहेत. ते आपणास बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी

वरील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून मला मान्य आहेत. या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

सर्व लॉटची एकूण रक्कम रु. ................(अक्षरी रु ............................)

(ठेकेदाराचे नाव , सही , शिक्का आणि मोबाईल नं., ई-मेल)

दिनांक. ..................

Scanned with OKEN Scanner

## निर्लेखन लॉटची यादी

जिल्हा परिषद नाशिक

| अ.क्र | विभागाचे नाव | लॉटचे नाव व क्रमांक | एकूण संख्या | हातची एकूण किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ . | जिल्हा परिषद नाशिक यांच्या अधिनिस्त तालुका आरोग्य अधिकारी,येवला | लॉट क्र. १, रुग्णालयीन उपकरणे | ८५ | १९,६१९ रु | |
| २ | | लॉट क्र. २ जड वस्तुसंग्रह उपकरणे | १८२ | २०,००६रु | |

डॉ. शरद श्रीरंग कातकाडे
तालुका आरोग्य अधिकारी(गट-अ)
आरोग्य विभाग, येवला